GRT GOLDEN RESEARCH THOUGHTS

ISSN: 2231-5063
IMPACT FACTOR : 4.6052(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 9 | MARCH - 2017

# महाराष्ट्रातील जमीन धारकांची संख्या व धारण केलेल्या जमिनीच्या क्षेत्रफळाचे मूल्यमापण (२०११–१२)




के. बी. गिरासे[1] , प्रा. डॉ. एस. व्ही. भोपे[2]
[1]सहयोगी प्राध्यापक,ग. तु. पाटील महाविदयालय, नंदुरबार.
[2]महिला महाविदयालय, नंदुरबार.

**सारांश :–**

काही वर्षांपासून जमिनीच्या खरेदीत फार मोठया प्रमाणात गुंतवणूक होत आहे. महाराष्ट्रात 1970–71 ते 2010–11 या कालावधी दरम्यान नऊ कृषि गणना झाल्या. त्यातील आकडेवारी पाहता राज्यात प्रत्येक कृषि गणनेत जमीन धारकांच्या संख्येमध्ये वाढ होत आहे. मात्र उपलब्ध जमिनीच्या क्षेत्रफळात वाढ होऊ शकत नसल्यामुळे जमीन धारकांचे सरासरी जमिनीचे आकार क्षेत्र कमी होत आहे. सदर लेखात महाराष्ट्रातील जिल्हानिहाय धारण केलेल्या जमिनीच्या आकारानुसार संख्या व धारण केलेले जमिनीचे क्षेत्रफळ याचे सविस्तर वर्गीकरण व मूल्यमापण संशोधन लेखात करण्यात आले आहे.

## प्रस्तावना:–

भारताची आठवी कृषि गणना 2005–06 नुसार भारतात एकूण 1292–22 लाख जमीन धारक होते. त्यांच्याकडे एकूण 1583–23 लाख हेक्टर जमिनीचे क्षेत्रफळ होते. कृषि गणना2010–11 नुसार जमीन धारकांची संख्या वाढून एकूण 1383–48 लाख एवढे जमीन धारक आहेत त्यांच्याकडे 1595–92 लाख हेक्टर एवढे जमिनीचे क्षेत्रफळ आहे.2005–06 ते 2010–11 या दरम्यान कृषि जमीन धारकांच्या संख्येत 91.26 लाख एवढी वाढझाली. तर धारण केलेल्या जमिनीच्या क्षेत्रफळात 2005–06 च्या तुलनेत 2010–11 मध्ये 12.69 लाख हेक्टर वाढएवढी झाली.

## अभ्यासाचा उद्देश :–

१) महाराष्ट्रातील जिल्हानिहाय एकूण जमीन धारकांची संख्या जाणून घेणे.
२) धारण केलेल्या जमिनीच्या आकारानिहाय जमीन धारकांची संख्या जाणून घेणे.
३) महाराष्ट्रातील जिल्हयानिहायव जमिनीचा आकारनिहाय धारण केलेले एकूण जमिनीचे क्षेत्रफळ माहीत करून घेणे.

महाराष्ट्रातील 35 पैकी 33 जिल्ह्यातील जमीन धारकांची जमिनीच्या आकारानिहाय व जिल्हानिहाय जमीन धारकांची संख्या व प्रत्येक जिल्ह्यातील एकूण जमीन धारकांची संख्या कोष्टक क्रमांक 1 मध्ये दर्शवलेली आहे.

**कोष्टक क्रं. –1**
**महाराष्ट्रातील जिल्हानिहाय जमिनीचा आकार नुसार एकूण जमीन धारक**

| जिल्हा | 0.5 हेक्टर पेक्षा कमी | 0.5 ते 1.0 हेक्टर | 1.0 ते 2.0 हेक्टर | 2.0 ते 3.0 हेक्टर | 3.0 ते 4.0 हेक्टर | 4.0 ते 5.0 हेक्टर | 5.0 ते 10.0 हेक्टर | 10.0 ते 20.0 हेक्टर | 20.0 हेक्टर आणि त्यापेक्षा जास्त | जिल्हानिहाय एकुण जमीन धारक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नंदुरबार | 7293 | 28685 | 60129 | 26490 | 10691 | 5807 | 7136 | 787 | 104 | 147122 |
| धुळे | 22226 | 56632 | 88955 | 35978 | 13440 | 7393 | 10550 | 723 | 102 | 235999 |
| जळगांव | 49411 | 99446 | 166281 | 62049 | 26894 | 13697 | 18929 | 1810 | 117 | 438634 |
| बुलढाणा | 57490 | 103490 | 160267 | 60580 | 23398 | 11413 | 12072 | 1335 | 143 | 430188 |
| अकोला | 20898 | 63607 | 95052 | 33855 | 12864 | 6591 | 8156 | 1112 | 118 | 242253 |
| वाशिम | 16562 | 41505 | 78579 | 29206 | 12611 | 7121 | 9374 | 1386 | 80 | 196424 |
| अमरावती | 32613 | 107810 | 171832 | 54291 | 21095 | 11341 | 14588 | 2115 | 173 | 415858 |
| वर्धा | 5455 | 29276 | 84121 | 37132 | 16679 | 9512 | 12260 | 1647 | 128 | 196210 |
| नागपुर | 24579 | 54751 | 104509 | 42633 | 18484 | 10124 | 11856 | 1482 | 147 | 268565 |
| भंडारा | 82114 | 67165 | 48911 | 12143 | 4392 | 1901 | 1792 | 201 | 53 | 218672 |
| गोंदिया | 104816 | 63358 | 50220 | 11835 | 3910 | 1666 | 1733 | 192 | 33 | 237763 |
| गडचिरोली | 25917 | 31425 | 41488 | 19025 | 7120 | 3992 | 4997 | 747 | 144 | 134855 |
| चंद्रपुर | 48991 | 64236 | 97509 | 46792 | 20657 | 11183 | 13376 | 1360 | 123 | 304227 |
| यवंतमाळ | 10984 | 29198 | 188598 | 81305 | 28670 | 17042 | 19375 | 3197 | 315 | 378684 |
| नांदेड | 96121 | 152991 | 211232 | 76216 | 24002 | 10284 | 10286 | 942 | 126 | 582200 |
| हिंगोली | 31201 | 47226 | 76037 | 31134 | 13069 | 6521 | 7079 | 724 | 112 | 213103 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| परभणी | 50213 | 79861 | 126927 | 48942 | 20758 | 9633 | 10570 | 938 | 76 | 347918 |
| जालना | 76203 | 100690 | 144025 | 53824 | 17940 | 8468 | 8339 | 766 | 87 | 410342 |
| औरंगाबाद | 121691 | 142682 | 175839 | 53501 | 17903 | 7968 | 8929 | 1114 | 234 | 529861 |
| ठाणे | 117801 | 53369 | 53947 | 22262 | 10996 | 6613 | 11385 | 2818 | 463 | 279654 |
| नाशिक | 139489 | 149007 | 203932 | 80255 | 30872 | 15733 | 20164 | 2895 | 315 | 642662 |
| रायगड | 155392 | 66195 | 48839 | 17932 | 8429 | 4677 | 7632 | 2143 | 409 | 311648 |
| पुणे | 251109 | 168492 | 179389 | 71941 | 30903 | 15284 | 20965 | 4365 | 791 | 743239 |
| अहमदनगर | 254388 | 243268 | 282733 | 101227 | 36251 | 16305 | 19027 | 2471 | 424 | 956094 |
| बीड | 166198 | 168791 | 195947 | 68017 | 26056 | 12129 | 13143 | 1253 | 249 | 651783 |
| लातूर | 51029 | 96239 | 142375 | 51966 | 21575 | 11387 | 12935 | 1345 | 65 | 388916 |
| सोलापूर | 105883 | 130936 | 212830 | 111638 | 45476 | 23920 | 31130 | 5484 | 613 | 667910 |
| उस्मानाबाद | 39608 | 71586 | 130022 | 55976 | 24215 | 13607 | 18799 | 2513 | 253 | 356579 |
| सातारा | 486827 | 187517 | 127574 | 33490 | 12225 | 5396 | 7474 | 1357 | 445 | 862305 |
| रत्नागिरी | 232330 | 77853 | 67016 | 30193 | 15927 | 9423 | 16043 | 4059 | 983 | 453827 |
| सिंधुदुर्ग | 175708 | 37747 | 30586 | 13189 | 6846 | 4203 | 7319 | 2242 | 712 | 278552 |

आधार–कृषि गणना, 2010–11

महाराष्ट्रात कृषि गणना 2010–11 नुसार राज्यात एकूण जमीन धारकांची संख्या 136.98 लाख होती. त्यांनी धारण केलेल्या जमिनीच्या आकारानुसार जमीन धारकांची वर्गवारी करता कोष्टक क्रं. 1 वरुण लक्षात येते की, 0.5 हेक्टर पेक्षा कमी जमिनीच्या आकाराचे क्षेत्रफळ धारण करणाऱ्या जमीन धारकांची संख्या राज्यात (36.46) लाख होती. ती एकूण जमीन धारकांच्या संख्येच्या 26.62 टक्के दिसून येते. 0.5 ते 1.0 हेक्टर जमीन धारण करणारे 30.63 लाख जमीन धारक होते तर 1.0 ते 2.0 हेक्टर आकाराचे जमिनीचे क्षेत्रफळ असणाऱ्यारची संख्या (40.52) लाख असून राज्यात या आकाराच्या जमिन धारकांची संख्या सर्वात जास्त 29.58 टक्के आहे. 2.0 ते 3.0 हेक्टर जमीन धारक (15.46) लाख, 3.0 ते 4.0 हेक्टर आकाराचे क्षेत्रफळ असणारे (6.13) लाख, 4.0 ते 5.0 हेक्टरचे जमीन धारक (3.14) लाख, 5.0 ते 10.0 हेक्टर जमीन धारक (3.96) लाख तर 10.0 ते 20.0 हेक्टर (0.59) लाख व 20.0 हेक्टर व त्यापेक्षा जास्त आकाराचे जमिनीचे क्षेत्रफळ धारण करणाऱ्या ची संख्या (0.09) लाख होती.

राज्यात 33 जिल्ह्यांपैकी सर्वात जास्त जमीन धारकांची संख्या असणारे पहिल्या पाच जिल्हयांची आकडेवारी पाहता अहमदनगर जिल्ह्यात (99. 56) लाख जमीन धारक असून त्यानंतर अनुक्रमे सातारा (8.62), पुणे (7.43),सोलापूर (6.68) व बीड जिल्ह्यात एकूण (6.52) लाख जमीन धारक आहेत. याविरुद्ध सर्वात कमी जमीन धारकांची संख्या असणारे जिल्हे गडचिरोली (1.35) लाख, नंदुरबार (1.47), वर्धा (1.96), वाशिम ( 1.96) व हिंगोली जिल्ह्यात (2.13) लाख जमीन धारक आहेत.

कृषि गणना 2010–11 प्रमाणे मुंबई उपनगर, व मुंबई वगळता महाराष्ट्रातील 35 जिल्ह्यांपैकी 33 जिल्ह्यांमध्ये जमीन धारकांनी जमिनीच्या आकारानुसार एकूण धारण केलेले जमिनीचे क्षेत्रफळ व जिल्हानिहाय धारण केलेले एकूण जमिनीचे क्षेत्रफळ कोष्टक क्रमांक 2 मध्ये दर्शलेले आहे.

### *कोष्टक क्रं. – २*
### *महाराष्ट्रातील जिल्हानिहाय एकूण जमिनीचा आकार नुसार धारण केलेले एकूण जमिनीचे क्षेत्रफळ*

| जिल्हा | 0.5 हेक्टर पेक्षा कमी | 0.5 ते 1.0 हेक्टर | 1.0 ते 2.0 हेक्टर | 2.0 ते 3.0 हेक्टर | 3.0 ते 4.0 हेक्टर | 4.0 ते 5.0 हेक्टर | 5.0 ते 10.0 हेक्टर | 10.0 ते 20.0 हेक्टर | 20.0 हेक्टर आणि त्यापेक्षा जास्त | जिल्हानिहाय एकुण जमीन धारक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नंदुरबार | 2484 | 21691 | 85448 | 62237 | 36636 | 25719 | 46430 | 9823 | 4736 | 295205 |
| धुळे | 7753 | 41798 | 126719 | 85487 | 45.958 | 32477 | 67672 | 9018 | 5413 | 422295 |
| जळगांव | 15491 | 75456 | 235685 | 148164 | 92331 | 60697 | 123302 | 22518 | 3534 | 777178 |
| बुलढाणा | 17610 | 79041 | 225810 | 143147 | 79893 | 50401 | 78250 | 16568 | 6617 | 697338 |
| अकोला | 7178 | 49982 | 135546 | 79513 | 43948 | 29168 | 53616 | 13899 | 5929 | 418794 |
| वाशिम | 5082 | 32659 | 111987 | 68654 | 43233 | 31494 | 61727 | 17212 | 2620 | 374668 |
| अमरावती | 11038 | 85151 | 242675 | 128304 | 72168 | 50275 | 95957 | 26782 | 5240 | 717590 |
| वर्धा | 1628 | 23920 | 120122 | 88308 | 57260 | 42093 | 80652 | 20756 | 3829 | 438569 |
| नागपुर | 7366 | 42427 | 149294 | 101737 | 63331 | 44810 | 77023 | 18633 | 4584 | 509207 |
| भंडारा | 25591 | 47503 | 66915 | 28527 | 14893 | 8470 | 11549 | 2640 | 1566 | 207655 |
| गोंदिया | 29106 | 45262 | 68647 | 28243 | 13355 | 7303 | 11136 | 2410 | 1124 | 206585 |
| गडचिरोली | 7222 | 23371 | 58777 | 44616 | 24500 | 17642 | 32831 | 9389 | 4384 | 222731 |
| चंद्रपुर | 14605 | 48147 | 138960 | 110614 | 70811 | 49501 | 87084 | 16813 | 4380 | 540914 |
| यवंतमाळ | 3593 | 22418 | 273112 | 187894 | 97934 | 74793 | 126783 | 39810 | 11689 | 838025 |
| नांदेड | 29978 | 112847 | 297817 | 176445 | 81655 | 45369 | 65981 | 11771 | 5105 | 826968 |
| हिंगोली | 9672 | 35338 | 108032 | 73525 | 44723 | 28844 | 45938 | 9206 | 3634 | 358910 |
| परभणी | 15529 | 59914 | 179459 | 115624 | 70932 | 42524 | 68015 | 11485 | 4784 | 568266 |
| जलना | 23210 | 74679 | 203817 | 126441 | 61359 | 37391 | 53313 | 9564 | 2883 | 592658 |
| औरंगाबाद | 36997 | 105757 | 247300 | 125614 | 60958 | 35218 | 58159 | 13921 | 7861 | 691785 |
| ठाणे | 23473 | 38695 | 77031 | 53742 | 37875 | 29443 | 77409 | 36729 | 15750 | 390147 |
| नाशिक | 37886 | 110459 | 288742 | 191364 | 105729 | 69663 | 132641 | 36527 | 9879 | 982890 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रायगड | 34495 | 46915 | 68272 | 43391 | 29013 | 20769 | 51505 | 28277 | 15425 | 338061 |
| पुणे | 63170 | 122447 | 254249 | 172694 | 105790 | 67790 | 139630 | 56968 | 27929 | 1010667 |
| अहमदनगर | 71623 | 178281 | 399881 | 241667 | 123786 | 72067 | 123821 | 31508 | 15709 | 1258344 |
| बीड | 47340 | 124126 | 277851 | 162084 | 89235 | 53647 | 84803 | 15921 | 11217 | 866225 |
| लातूर | 16411 | 73165 | 201433 | 123125 | 73896 | 50388 | 83808 | 16622 | 1832 | 640681 |
| सोलापूर | 30989 | 98626 | 305392 | 266975 | 155578 | 105736 | 207059 | 69841 | 20262 | 1260459 |
| उस्मानाबाद | 11927 | 54411 | 186696 | 132511 | 83074 | 60279 | 123897 | 31651 | 9071 | 693517 |
| सातारा | 108856 | 132840 | 175638 | 80188 | 41738 | 23863 | 49199 | 17602 | 16429 | 646353 |
| रत्नागिरी | 47100 | 55575 | 94901 | 73583 | 54812 | 41917 | 108352 | 53688 | 31718 | 561646 |
| सिंधुदुर्ग | 26762 | 26898 | 43085 | 32068 | 23586 | 18698 | 49826 | 29775 | 28382 | 279080 |
| कोल्हापूर | 75606 | 89977 | 125357 | 59230 | 30468 | 18725 | 34860 | 10376 | 13196 | 457795 |
| सांगली | 51201 | 88181 | 164401 | 112366 | 66895 | 42888 | 90483 | 34698 | 24740 | 675853 |
| मुंबई उपनगर | उ.ना | उ.ना | उ.ना | उ.ना | उ.ना | उ.ना | उ.ना | उ.ना | उ.ना | उ.ना |
| मुंबई | उ.ना | उ.ना | उ.ना | उ.ना | उ.ना | उ.ना | उ.ना | उ.ना | उ.ना | उ.ना |
| एकूण जमिनीचे क्षेत्रफळ | 917973 | 2267959 | 5739050 | 3668098 | 2097352 | 1390063 | 2602684 | 752403 | 331449 | 19767061 |

आधार–कृषि गणना, 2010–11

महाराष्ट्रातील 35 पैकी 33 जिल्ह्यांमध्ये जमीन धारकांनी जमिनीच्या आकारानुसार धारण केलेल्या जमिनीचे क्षेत्रफळ राज्यातील 0.5 हेक्टर पेक्षा कमी जमीन धारकांकडे 9.18 लाख हेक्टर होते.0.5 ते 1.0 हेक्टर जमिनीचे क्षेत्रफळ धारण करणाऱ्यांकडे 22.68 लाख हेक्टर जमिनीचे क्षेत्रफळ असून 1.0 ते 2.0 हेक्टर जमीन धारकांकडे 57.39 लाख हेक्टर आहे राज्यात या जमीन धारकांकडे एकूण जमिनीच्या क्षेत्रफळापैकी सर्वात जास्त जमिनीचे क्षेत्रफळ असून ते राज्यातील एकूण धारण केलेल्या जमिनीच्या 29.03 टक्के आहे. 2.0 ते 3.0 हेक्टर जमीन धारकांकडे 36.68 लाख हेक्टर जमिन असून एकूण धारण केलेल्या जमिनीच्या 18.56 टक्के आहे. 3.0 ते 4.0 हेक्टर जमीन धारकांकडे 20.67 लाख हेक्टर जमीन असून 4.0 ते 5.0 हेक्टर जमीन धारकांकडे 13.90 लाख हेक्टर जमीन आहे. 5.0 ते 10 हेक्टर जमीन मालकांकडे 26.03 लाख हेक्टर, 10.0 ते 20.0 हेक्टर जमीन धारकांकडे 7.52 लाख हेक्टर आणि 20.0 हेक्टर व त्यापेक्षा जास्त जमीन धारण करणाऱ्यांकडे 3.31 लाख हेक्टर जमीन आहे. राज्यातील सर्व जमीन धारकांकडे एकुण 197.67 लाख हेक्टर जमीन आहे.

महाराष्ट्रात जमीन धारकांनी सर्वात जास्त जमिनीचे क्षेत्रफळ धारण केलेले पहिले पाच जिल्हे अनुक्रमे सोलापूर (12.60) लाख हेक्टर, अहमदनगर (12.58), पुणे (10.11), नाशिक (9.83) व बीड (8.66) लाख हेक्टर जमिनीचे क्षेत्रफळ जमीन धारकांकडे आहे. राज्यातील जमीन धारकांकडे सर्वात कमी जमीन असणारे पहिले पाच जिल्हे गोंदिया (2.07) लाख हेक्टर, भंडारा (2.08), गडचिरोली (2.23), सिंधुदुर्ग (2.79) व नंदुरबार (2.95) लाख हेक्टर जमीन या जिल्ह्यातील जमीन धारकांकडे आहे.

## *निष्कर्ष :–*

1) महाराष्ट्रात सर्व आकाराच्या जमिनीचे क्षेत्र धारण केलेल्या एकूण जमीन धारकांपैकी 26.61 टक्के जमीन धारकांनी 0.5 हेक्टर पेक्षा कमी जमिनीचे क्षेत्र धारण केलेले होते. या जमीन धारकांकडे एकूण जमिनीच्या क्षेत्रापैकी 4.64 टक्के क्षेत्र होते.
2) राज्यात 0.5 ते 1.0 हेक्टर जमिनीचे क्षेत्र धारण करणारे 22.36 टक्के होते. त्यांनी एकूण जमिनीपैकी 11.47 टक्के जमीन धारण केलेली होती.
3) 1.0 ते 2.0 हेक्टर जमिनीचे क्षेत्र धारण करणारे 29.58 टक्के होते. यांच्याकडे राज्यातील एकूण जमिनीपैकी 29.03 टक्के जमीन होती.
4) राज्यात 2.0 ते 3.0 हेक्टर जमीन धारण करणारे 11.29 टक्के असून यांनी एकूण जमिनीच्या 18.56 टक्के जमीन धारण केलेली होती.
5) 3.0 ते 4.0 हेक्टर जमिनीचे क्षेत्र धारण करणारे जमीन धारक 4.47 टक्के होते. यांच्याकडे 10.61 टक्के जमीन होती.
6) राज्यात4.0 ते 5.0 हेक्टर जमिनीचे क्षेत्र धारण करणारे 2.29 टक्के असून त्यांनी एकूण जमिनीच्या क्षेत्रापैकी 7.03 टक्के जमिनीचे क्षेत्र धारण केलेले होते.
7) 5.0 ते 10 हेक्टर जमींचे क्षेत्र धारण करणाऱ्यांची संख्या 2.89 टक्के असून यांच्याकडे एकूण जमिनीच्या क्षेत्रापैकी 13.17 टक्के क्षेत्र धारण केलेले होते.
8) राज्यात10.0 ते 20.0 हेक्टर जमिनीचे क्षेत्र धारण करणारे फक्त 0.43 टक्के होते. या जमीन धारकांणी 3.81 टक्के जमिनीचे क्षेत्र धारण केलेले होते. 20.0 हेक्टर व त्यापेक्षा जास्त जमिनीचे क्षेत्र धारण करणाऱ्यांचीसंख्या राज्यात फक्त 0.06 टक्के असून यांच्याकडे एकूण जमिनीच्या क्षेत्रापैकी 1.68 टक्के जमिनीचे क्षेत्र होते.
9) महाराष्ट्रातील जिल्हानिहाय सर्वात जास्त जमिनीचे क्षेत्र सोलापूर जिल्ह्यात होते. तर सर्वात कमी क्षेत्र गोंदिया जिल्ह्यात होते. एकूण राज्यातील जमिनीच्या क्षेत्रफळापैकी सोलपूर जिल्ह्यात 6.38 टक्के क्षेत्र होते तर गोंदिया जिल्ह्यात 1.05 टक्के क्षेत्र होते.

यावरून असे दिसून येते की, महाराष्ट्रात 1.0 ते 2.0 हेक्टर जमिनीचे क्षेत्रफळ असणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या सर्वात जास्त आहे. राज्यातील एकूण जमिनीच्या क्षेत्रापैकी सर्वात जास्त क्षेत्र यांच्याकडे होते. अध्ययनावरून असेही निदर्शनास येते की, राज्यात अल्पभूधारकांच्या संख्येत वाढ होत आहे. जमिधारकांच्या संख्येत वाढ होत आहे मात्र जमीन कमी होत असल्याने त्याचा परिणाम जमिनीचे तुकडीकरणात होत आहे.

## *संदर्भः–*


1) Agriculture Census of India 2000–01 and 2010 -11
2) Agriculture Census of Maharashtra 2000-01 and 2010-11
3) Agricultural Statistics at glance Directorate of Economics and Statistics.
4) Geography of Maharashtra – Dr. S. M. Bhamare Prashant Publication, Jalgaon- -
5) Report of Agricultural Census 2000&01Maharashtra State Department of Agriculture, Pune.
6) कृषि शास्त्र आणि कृषि विकास – रंजन कोळंबे, भागीरथ प्रकाशन, पुणे.
7) महाराष्ट्राची संक्षिप्त सांख्यिकी, 2012– अर्थ व सांख्यिकीसंचालनालय महाराष्ट्र शासन.
8) agcensus-dacnet-nic-in
9) महाराष्ट्रची आर्थिक पाहणी 2011–12